१००/- स्टॅम्प पेपर **Affidavit**

# प्रतिज्ञापत्र

मी खाली सही करणार श्री/कु. ——————————————————— शपथेवर आणि सत्य प्रतिज्ञेवर अस लिहून देतो की, एम. एस.आयुर्वेदिक मेडीकल कॉलेज, हॉस्पीटल, रिर्सच महाविद्यालय गोंदिया या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून असे प्रमाणित करतो की, मी एस.सी./एस.टी/ ओ.बी.सी./ एस.बी.सी./एन.टी.व्ही.जे./ आर्थिकदृष्टया मागास (EBC) आर्थिक दुर्बल घटक(EWS) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्ग (SEBC)/ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना(ई.बी.सी.) / अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना या प्रवर्गातील असून शिष्यवृत्ती/ फ्रीशीप करता अर्ज करत आहे. सदर हमीपत्राव्दारे मी मान्य करतो/ करते की, प्रचलित शासन निर्णय नुसार माझे कुटुंबातील वडील आणी आई यांचे दोघांचे सर्व स्त्रोतांचे मिळून सन. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील एकत्रित उत्पन्न रु............. एवढे आहे. तसेच माझ्या पालकांचे उत्पन्न खोटे अथवा बनावट आढळल्यास होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस मी व माझे पालक जबाबदार राहतील. अर्ज करत असलेल्या शिष्यवृत्तीच्या सर्व अटी व शर्ती मला माहीत असून त्याची मी पुर्णपणे पुर्तता केलेली आहे आणी म्हणून मी सदर शिष्यवृत्ती/फ्रीशीपसाठी शासनाच्या  नियामाप्रमाणे पात्र असून  शिष्यवृत्तीचा/फ्रीशीपचा लाभ घेण्यासाठी अर्ज करत आहे.

२. मी महाराष्ट्र राज्याचा अधिवासधारक आहे.

३. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे(CAP) झालेला आहे.

४. माझा प्रवेश हा मॅनेजमेंट कोटयातून झालेला नाही.

५. मी फक्त या योजनेच्या  सवलतीचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. अन्य कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही, अशी हमी देत आहे.

६. मी प्रवेश घेतलेल्या  अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक वर्षाची परिक्षा देणे मला बंधनकारक आहे याची मला जाणीव असून ७५ टक्के शैक्षणिक उपस्थिती शिष्यवृत्तीसाठी अनिवार्य आहे. मी अनुत्तीर्ण झाल्याने पुढील वर्षा प्रवेश मिळालेला नाही असे माझ्या बाबतीत झालेले नाही. असे झाल्यास मी या योजनेसाठी पात्र राहत नाही याची मला पुर्ण जाणीव असून असा लाभ घेतल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र आहे.

७. मी माझ्या चालू अभ्यासक्रमात दोन वेळा अनुत्तीर्ण झालेलो नाही. असे असल्यास मी या योजनेचा लाभ घेण्यास कायमस्वरुपी अपात्र आहे याची मला जाणीव आहे.

८. मी १२ वी पास झाल्यानंतर शिष्यृत्ती मिळालेला व्यावसायीक अभ्याक्रम अर्धवट सोडून आलेलो/आलेली नाही आणि यावूर्पी शिष्यवृत्तीचा सन २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष अभ्यासक्रमास लाभ घेतलेला नाही याची हमी देतो/देते. तसेच माझा सध्याचा अभ्यासक्रम मी अर्धवट सोडून गेलो/गेली तर मला प्रदान केलेल्या शैक्षणिक शुल्क प्रतीपुर्तीची रक्कम मी शासणास एकरकमी परत देण्यास बांधील असून व महाविद्यालयाचे संपूर्ण शिक्षण शुल्क भरण्याची जबाबदारी माझी राहील त्याची मला पूर्ण जाणीव आहे व त्याप्रमाणे कुठलीही सबब न देता मी शासनास रक्कम परत करीन. तसे न केल्यस कायदेशीर कार्यवाहीस व होणाऱ्या संपूर्ण परीणानामा व नुकसानीस मी स्वतः जबाबदार राहीन.

९. मी दिलेल्या अर्जात नमुद केलेली माहीती व अर्जासोबत सादर केलेले शैक्षणिक कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभुल करणारी नाहीत. महाविद्यालयास सादर केलेली माहिती व कागदपत्रे खोटी, बनावट, चुकीची किंवा दिशाभुल करणारी आढल्यास किंवा असे निदर्शनास आल्यास उर्वरीत कालावधीसाठी मला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही याची मला जाणीव आहे व या कारणास्तव माझा प्रवेश रद्द झाल्यास सर्वस्वी मी स्वतः व माझे पालक जबाबदार राहतील. तसेच मला मिळालेली प्रतिपुर्ती शुल्काची रक्कम व्याजासह माझ्याकडून वसुल करण्यात येईल याची मला जाणीव आहे. तसेच त्यापुढे मला शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपुर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल त्याची मला जाणीव आहे. त्यामुळे होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस आणि शिक्षेस मी सर्वस्वी जबाबदार राहीन याची मला जाणीव आहे. त्याबाबत माझी शासना बदद्ल आणि महाविद्यालया बदद्ल आणि महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांबदद्ल कुठलीही तक्रार असणार नाही.

१०. जर भविष्यात शासनाने मला या योजनेसाठी अपात्र ठरवले आणि / किंवा शिष्यवृत्तीची रक्कम वसूल करण्याचे आदेश काढले तर मी स्वखूशीने आणि कुठल्याही दबावाला बळी न पडता प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते आहे की शिष्यवृत्तीची घेतलेली सर्व रक्कम दंड आणि व्याजासहित ताबडतोब परत करण्यास मी पूर्णपणे बांधील राहीन व महाविद्यालयाचे संपूर्ण शिक्षण शुल्क भरण्याची जबाबदारी माझी राहील त्याची मला पूर्ण जाणीव आहे. शासनाकडून वेळोवेळी होणाऱ्या लेखापरिक्षणात माझ्याबदद्लच्या कागदपत्र / मंजूर रक्कम यामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास त्याची भरपाई करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. या संदर्भात माझी महाविद्यालय आणि प्राचार्य व कर्मचारी वर्ग यांच्याबदद्ल काहीएक तक्रार असणार नाही.

११. मी वर दिलेली सर्व माहिती खरी असून त्यात काही खोटी माहिती आढळून आल्यास होणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीस आणि परीणामास मी स्वतः जबाबदार राहीन. तसेच नियमाप्रमाणे शासनास रक्कम परत करण्यास मी बांधील राहीन. यासाठी हे प्रतिज्ञापत्र स्वच्छेने, कुठल्याही दबावाला बळी न पडता व राजीखूशीने लिहून देत आहे.

विद्यार्थ्याचे नाव व सही　　　　वडील नाव व सही　　　　आई नाव व सही

व्यवसायः.................... ........................ ........................

आधार नंः.................... ........................ ........................

पॅन नं. .................... ........................ ........................

संपूर्ण पत्ता व संपर्क न.

साक्षीदार : नाव व सही :

आधार व पॅन नं :

संपूर्ण पत्ता व संपर्क न. :

स्थळ व दिनांक :